सकाळ 17-01-2024 पान नं. 3 (2)

# नवीन धोरणामुळे सहकार चळवळ सशक्त

## दिलीप वळसे पाटील यांचे मत; 'व्हॅम्निकॉम'चा स्थापना दिवस उत्साहात

**पुणे, ता. १६ : "सहकार चळवळीने ग्रामीण भागातील लोकांचे जीवनमान उंचावले आहे. केवळ शेतकर्ज पुरवठ्यापर्यंत मर्यादित न राहता पतसंस्था, ग्राहक संस्था, साखर आणि दुग्ध संस्थांपर्यंत अनेक क्षेत्रांत ही चळवळ उभी राहिली आहे. सहकार चळवळीचा नव्याने आढावा घेत समग्र व्याप्ती असलेले धोरण निश्चित केले आहे. आर्थिक विकास साध्य करणारे हे धोरण सहकार चळवळीला सशक्त करेल," असे मत राज्याचे सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांनी व्यक्त केले.**




**व्हॅम्निकॉम, गणेशखिंड :** संस्थेच्या तिमाही शोधपत्रिकेचे प्रकाशन करताना (डावीकडून) आर. के. मेनन, प्रा. सुरेश गोसावी, डॉ. हेमा यादव, दिलीप वळसे पाटील आणि डॉ. मीनेश शहा.

वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकारी व्यवस्थापन संस्थेच्या (व्हॅम्निकॉम) ५७व्या स्थापना दिवस कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी राष्ट्रीय दुग्ध विकास संस्थेचे (एनडीडीबी, आनंद) अध्यक्ष डॉ. मीनेश शहा, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. सुरेश गोसावी, 'व्हॅम्निकॉम'च्या संचालक डॉ. हेमा यादव, पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष डॉ. दिगंबर दुर्गाडे, डॉ. वाय. एस. पाटील, आर. के. मेनन आदी उपस्थित होते.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सहकाराकडे सामाजिक परिवर्तनाचा स्रोत म्हणून पाहिले जायचे, असे मत वळसे पाटील यांनी व्यक्त केले. ते म्हणाले, "सहकारितेत आर्थिक विकासाचे नवे मॉडेल विकसित करण्यात येत आहे. वेगवेगळ्या संस्थांना प्रोत्साहन देण्यात येणार आहे. गाव पातळीवरील विविध कार्यकारी सोसायट्यांना येत्या काळात महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडावी लागणार आहे. शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय घेताना प्राथमिक संस्थांचे संगणकीकरण, व्यवसाय विस्तारीकरण आदी महत्त्वपूर्ण बदल करावे लागणार आहेत." समाजाभिमुख कार्यासाठी सहकार क्षेत्र महत्त्वाचे असल्याचे मत गोसावी यांनी व्यक्त केले. या वेळी को-ऑपरेटिव्ह परस्पेक्टिव्ह शोधपत्रिकेचे प्रकाशन करण्यात आले.

### 'एमबीए'चा अभ्यासक्रम...

- **पुणे विद्यापीठाच्या मदतीने व्यवस्थापनशास्त्रातील पदव्युत्तर पदवीचा (एमबीए) अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहे, अशी माहिती डॉ. हेमा यादव यांनी दिली. सहकार क्षेत्रातील एमबीए म्हणून हा अभ्यासक्रम ओळखला जाणार आहे. उद्योजकता विकासासाठी संस्थेतर्फे विशेष लक्ष दिले जात असल्याचे यादव म्हणाल्या.**

### वळसे पाटील म्हणाले...

- **सहकार क्षेत्रातील सचिव आणि सदस्यांना कॉर्पोरेट प्रशिक्षण गरजेचे**
- **'सहकारातून समृद्धीकडे' धोरण राबवून शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय गरजेचे**
- **कृषी संस्थांनी ५२ प्रकारच्या क्षेत्रांत काम करावे**
- **बँकिंग क्षेत्रातील सुधारणांमुळे सहकारी बँका सुदृढ होतील**
- **सहकार क्षेत्राने सकारात्मक बदलाला सामोरे जावे**
- **सहकारी संस्थांचे संगणकीकरण करावे लागणार**